**MINUTES OF THE ENVIRONMENTAL PUBLIC HEARING FOR PROPOSED ESTABLISHMENT OF 90.0 KLPD MOLASSES (B & C HEAVY) / SUGARCANE SYRUP BASED DISTILLERY WITH 3.0 MW ELECTRICITY GENERATION UNIT TO BE LOCATED GAT NO. 133/1/B, 133/2/B, 134, 135/3/B, 135/5, 149/1, 149/3, 151, 160/12, 160/18, 160/3, 160/7, 132, 133/1/A, 149/2, 160/11, 160/2, 160/4, 160/9, 131/1, 3, 6, 7, 8, 9, 10, 11, 12, 13, 14, 15 AT POST – DAULATNAGAR, VILLAGE-MARALI, TALUKA – PATAN, DISTRICT – SATARA, MAHARASHTRA BY PROJECT PROPONENT M/S LOKNETE BALASAHEB DESAI SAHAKARI SAKHAR KARKHANA LTD., AT POST -DAULATNAGAR, MARALI VILLAGE, TALUKA -PATAN, DISTRICT-SATARA,MAHARASHTRA**

---

The Environment Public Hearing in respect of proposed establishment of 90.0 KLPD Molasses (B & C Heavy) / Sugarcane Syrup Based Distillery With 3.0 MW Electricity Generation Unit to be located at Gat No. 133/1/B, 133/2/B, 134, 135/3/B, 135/5, 149/1, 149/3, 151, 160/12, 160/18, 160/3, 160/7, 132, 133/1/A, 149/2, 160/11, 160/2, 160/4, 160/9, 131/1, 3, 6, 7, 8, 9, 10, 11, 12, 13, 14, 15 At Post – Daulatnagar, Village – Marali, Taluka – Patan, District – Satara, Maharahtra by Project Proponent M/s Loknete Balasaheb Desai Sahakari Sakhar Karkhana Ltd., At Post – Daulatnagar, Marali Village, Taluka – Patan, District – Satara, Maharashtra was conducted on Thursday, the 31st August, 2023 at 11.00 a.m. at the project site at M/s Loknete Balasaheb Desai Sahakari Sakhar Karkhana Limited, At Post – Daulatnagar, Village-Marali, Taluka – Patan, District – Satara, Maharashtra.

Shri Amol A. Satpute, Sub Regional Officer, Maharashtra Pollution Control Board, Satara and Convener of the Environment Public Hearing Committee welcomed Shri. Prashant Aavate, Additional District Magistrate, Satara and Chairman of the Environment Public Hearing Committee, Shri Shankar Waghmare, Regional Officer, Maharashtra Pollution Control Board, Pune and Member of the Environment Public Hearing Committee and Environmentalists, NGOs, Journalists, Representative of media channels and Company Officials and local people/participants who were present and with permission of Chairman, Environment Public Hearing Committee started the proceedings.

Convener, Environment Public Hearing Committee informed that as per the Environment Impact Assessment (EIA) Notification of Ministry of Environment, Forest & Climate Change, Govt. of India, (i.e. MoEF & CC, GoI) dated 14th September, 2006 as amended on 1st December, 2009, it is mandatory to conduct prior public consultation to certain projects which are covered in the schedule of the said Notification.

He informed that Maharashtra Pollution Control Board was in receipt of application from Project Proponent M/s Loknete Balasaheb Desai Sahakari Sakhar Karkhana Ltd., At Post – Daulatnagar, Marali Village, Taluka – Patan, District – Satara, Maharashtra to conduct Environment Public Hearing for proposed establishment of 90.0 KLPD Molasses (B & C Heavy) / Sugarcane Syrup Based Distillery With 3.0 MW Electricity Generation Unit to be located at Gat No. 133/1/B, 133/2/B, 134, 135/3/B, 135/5, 149/1, 149/3, 151, 160/12, 160/18, 160/3, 160/7, 132, 133/1/A, 149/2, 160/11, 160/2, 160/4, 160/9, 131/1, 3, 6, 7, 8, 9, 10, 11, 12, 13, 14, 15 At Post – Daulatnagar, Village – Marali, Taluka – Patan, District – Satara, Maharahtra

Convener further informed as per EIA Notification, 2006 the category of project falls under Category B1 schedule 5 (g), 1 (d) which requires to obtain prior Environmental Clearance from the Environment & Climate Change Department, Govt. of Maharashtra, Mumbai for which prior environmental consultation is mandatory.

Convener informed that the aim of conducting prior public consultation is to make aware, local people who can be participant in the hearing and they should know the developmental activities and Environment Management Plan of the unit.



Amol

Project Proponent had submitted online prescribed application on along with pre-feasibility report to obtain Terms of Reference (ToR) to the, State Environment Impact Assessment Authority (SEIAA), Environment & Climate Change Ministry, Maharashtra Government, Mumbai on 25-03-2023 and it has been considered and given online approval on 27-03-2023.

Hon'ble Collector, Satara directed to conduct the Physical Environment Public Hearing on Thursday, the 31st August, 2023 at 11.00 morning , and as per the Notification dated 14-09-2006 issued by Ministry of Environment, Forest & Climate Change, Govt. of India, (MoEF & CC, GoI), New Delhi and subsequent amendment on 01-12-2019, Member Secretary, Maharashtra Pollution Control Board, Mumbai has constituted Environment Public Hearing Committee vide Board's Office Order No. E-56 of 2023 under letter no. BO/JD (WPC)/PH/B- 230808- FTS- 0176 dated 08/08/2023.

| | |
|---|---|
| 1) District Magistrate-Satara or his representative not below the rank of an Additional District Magistrate | **Chairman** |
| 2) Representative of Maharashtra Pollution Control Board, Mumbai - Regional Officer Maharashtra Pollution Control Board, Pune | **Member** |
| 3) Sub Regional Officer, Maharashtra Pollution Control Board, Satara | **Convener** |

As per said Notification, 30 days' advance public notice was published by Sub Regional Officer, Maharashtra Pollution Control Board, Satara in the Local Newspaper in Daily Sakal for Marathi and in National Newspaper Indian Express for English on 31st July, 2023. The public were appealed to send their suggestions, views, doubts or objections regarding the proposed unit.

Also copy of EIA report and executive summery were made available in Marathi and in English at various notified Government offices as under:-

1) District Collector, Satara,
2) General Mnager, District Industries Center, Satara
3) Chief Executive Officer, Zilla Parishad, Office, Satara;
4) Tahsildar, Tahsil Office, Patan, Taluka – Patan, District – Satara;
5) Grampanchayat Office – At Post – Marali, Taluka – Patan, District – Satara;
6) Environment & Climate Change Department, Maharashtra Government, New Administrative Building, 15th Floor, Mantralaya, Madam Cama Road, Mumbai – 400 032;
7) Ministry of Environment, Forest & Climate Change, Zonal Office, Western-Central Zone, New Secretariat Building, Ground Floor, East Wing, Civil Line, Nagpur-440 001;
8) Joint Director (WPC), Maharashtra Pollution Control Board, Kalpataru Point, 1st,2nd,3rd, 4th Floor, Sion-Matunga Scheme Road No.8, Opp. Cine Planet Cinema, Near Sion Circle, Sion (East), Mumbai – 400 022;
9) Regional Officer, Regional Office, Maharashtra Pollution Control Board, 3rd Floor, Jog Center, Old Mumbai-Pune Road, Wakadewadi, Pune – 411003.

10) Sub Regional Officer, Sub Regional Office, Maharashtra Pollution Control Board, New Administrative Building, 2nd Floor, Behind S.T.Stand, Sadar Bazar, Satara;

11) Web site Maharashtra Pollution Control Board, Mumbai;

Convener further informed that not a single suggestion/objection is received by Sub Regional Office, Maharashtra Pollution Control Board, Satara.

Convener informed that an opportunity is given to all participants to raise any doubts, suggestions or objections regarding the proposed project in environmental angle, which can be submitted by orally or in writing also.

Convener asserted that this Committee is only for recording public opinion, views, suggestions, objections regarding the proposed project in environmental angle only and the Committee has no right to approve, reject or recommend the project. The suggestions/objections raised by the participants in the public hearing will be noted and it will be included in the minutes of the meeting. Similarly, the revised Environmental Assessment Report of the Project Proponent, written suggestions/objections and minutes of the meeting after approval of Chairman will be submitted through MPCB Head Office to the Environment & Climate Change Ministry, Maharashtra Government, Mumbai after taking note of the video recording of the said meeting, suggestions and objections recorded in the meeting. An Expert Committee there takes further decision regarding the same He requested Chairman of the Environment Public Hearing Committee to inform Project Proponent to start the presentation.

With the permission of the Chairman, the Environmental Consultant of the project made a presentation on the entire Environmental Management Plan (EMP) for the proposed project.

He said that the total investment of the said distillery project is 130.0 crores, the investment of the sugar factory is Rs 47.23 crores – a total of 177.23 crores. Whereas, the capital cost for Environmental Management is approximately - Rs.1,310.00 lakhs, while the annual maintenance cost is - Rs.200.0 lakhs. The said project is Zero Liquid Discharge (ZLD) project

After the Presentation, Convener, Environment Public Hearing Committee appealed all participants to raise their suggestions, objections in respect of proposed project in environmental angle only. While asking questions, full name and residential address should be informed.

**Views, questions, suggestions/objections raised during the Environmental Public Hearing and the answers/promises given by the Project Proponent/ Project Environment Consultant / Environmental Public Hearing Committee :-**

1) **Shri Jalandar Anant Patil, At Post – Marli, Taluka-Patan, District – Satara-**
How much alcohol will be produced per day from the Proposed Molasses Project?
Environmental Consultant said that this is a 90.0 Kilo Liter Per Day capacity project. R. S., ENA, Ethanol will be produced at 90.0 KLPD i.e. 90.0 thousand liters per day.

2) **Shri Santosh Nivrutti Giri, At Post – Marali, Taluka – Patan, District – Satara :-**
How much cost will be spent for this Distillery Project?
Project Environmental Consultant replied that the cost of the distillery project is 130.0 crores. The investment of sugar factory is 47.23 crores. Rupees 130.0 crore investment for complete distillery and manufacturing process.

Amol

3) **Shri Nitin Mahadeo Jagtap, Administrator, Gram Panchayat – Marali, Taluka – Patan, District – Satara :-**

I request to give an explanation as how this project will bring development to the people of the villages?

Project Environmental Consultant said that the people of the village will get job opportunities in the project. 40 persons will get direct employment in this distillery project. Due to the Distillery project, the project will give a huge boost to the indirect business in the area like transport tankers, commercial vehicles, two wheeler repair centers, tea and leaf shops business. Moreover, this distillery project can provide additional income to the project. Carbon-di-Oxide can be sold for the bottling plants for beverages, the potash can be used as fertilizer from the Potash Recovery project in the project. Hence, the local sugarcane farmers could be given additional price for sugar cane crop. The spent wash from the distillery plant will be converted into powder. It will be made available to the farmers for use as fertilizer at low cost.

4) **Shri Sangram Subhash Desai, At Post – Marali, Taluka – Patan, District – Satara :-**

It is informed that effluent will not be released outside the project. Then, what will be done with the waste water which will be produced in the distillery project?

Environment Consultant answered that the first source of wastewater in a distillery is the spent wash. The raw spent wash will be evaporated and concentrated in M.E.E.

Then the spent wash will be dried and converted into powder. Effluent from other sources of the project will be processed in the CPU – (Condensate Polishing Unit) from the cooling, boiler and will be recycled and reused in the production process. Therefore, 839.0 M3 of molasses from the factory will be processed in CPU and it will be recycled and reused in the project production. Therefore, the need for fresh water is reduced.

5) **Shri Uttamrao Ramchandra Kharade, Residence -Chopdarwadi Sangvad, Taluka – Patan, District-Satara:-**

Our village is adjacent to the project. So, will the villages in the area suffer smell nuisance due to the spent wash generated in the production plant and what are the remedial plans for the same?

Environmental Consultant said that this is a good question. In earlier days, the spent wash used to store in the open lagoons, due to which there was smell nuisance in the vicinity of the project. Now there will be a closed circuit. The spent wash will pass through the distillation column to bio-methinization. It will be stored for only one day. After bio-menthisnization, it will go for concentration, then immediately to dryer and spent wash will be converted into powder form. Hence surrounding area of the project will not suffer smell nuisance.

6) **Shri Prashant Krushnaji Mohite, At Post – Marali, Taluka – Patan, Distric – Satara :-**

Will there be any problem of noise pollution in the area due to the said project?

There is no friction equipments in the distillery. In a distillation plant, where there are pumps, motors, there noise is generated. In a distillation plant, noise occurs in the distillation columns, but it will not travel outside the plant fence. Just as there are dampers and breakers in a Mining Project, there is no noise in fermentation. There is only the sound of pumps. Distillation columns produce steam noise. The noise will not go outside the project fence or to the village. The workers working near the noise generating units will be provided ear plugs, muffs. There will be no noise pollution the project.

7) **Shri Krishna Vittal Kadam, At Post – Marali, Taluka – Patan, District – Satara:-**

What benefit will the project bring to the surrounding villages?

40 persons of the project village area will get direct employment. A distillation plant will produce by-products viz. Carbon-di-Oxide, after bottling it will sent for beverages and the potash recovery project. It can generate additional income for the project. Therefore, the local farmers could be paid additional price for their sugarcane crop. Potash ash can be used by farmers as fertilizer. The spent wash from the distillation plant will be converted into powder. It will be made available to the farmers for use as fertilizer at low cost.

Due to the Distillery project, the project will give a huge boost to the indirect business in the area like transport tankers, commercial vehicles, two wheeler repair center, pan and tea small shops.

Moreover, this distillation project can provide additional income to the project due to carbon-dioxide bottling, potash recovery project in the project. Therefore, local farmers can get additional price for their sugarcane crop from the sugar factory. Potash ash can be used by farmers as fertilizer.

The spent wash from the distillation plant will be converted into powder. It will be made available to the farmers for use as fertilizer at low cost.

Project Environment Consultant requested Managing Director of the Project to give answer.

Managing Director of the project said that a total of 79 persons are required in the proposed distillery project. Out of this, 41 skilled workers will be required, while 38 unskilled workers will be required. Skilled workers will be selected according to merit. The unskilled workers will be taken from the local area. This project will generate job opportunities.

Managing Director of the project said that the additional income generated by the distillery project would enable the sugarcane to be priced higher.

8) **Shri Deepak Shankar Gavhane, Residence – Gavhanewadi, Taluka – Patan, District – Satara -**

How much spent wash will be generated in the proposed alcohol manufacturing plant and how will it be disposed of?

Environmental Consultant said that although the prescribed limit of raw spent wash is 8.0 kilo liters, we will concentrate it upto 3.0 kilo liters. So, 144.0 KLPD of spent wash will come out after concentrating. It is possible to convert it into powder form and make it available as fertilizer to the farmers at low cost. The plant can produce 144.0 KLPD of spent wash, while molasses of 720.0 KLPD will be the maximum quantity produced in the project.

9) **Shri Madhukar Hindurao Suryawanshi, Sangoli Vikas Samiti Society, Residence – Suryawanshiwadi, Taluka – Patan, District – Satara –**

I congratulate Project Management for this 177 crore project. Now my question is how many days this distillery project will be operated?

Project Environmental Consultant answered that the distillery project will be operational throughout the year. The project will be in operation for 330 days as 30 days are reserved for maintenance. Because the project will be ZLD - Zero Liquid Discharge. It means not a single drop of treated waste water will be released outside the project. There will be no more composting.

She informed that in earlier days, spent wash is to be biomethinized then it was taken for composting. Composting cannot be done during monsoon. Because



Amal

the temperature cannot stay that much high, hence the bacterial culture does not grow as much. Therefore, composting will not be done as per the directives of the Ministry of Environment, Forest and Climate Change, Government of India, New Delhi. So instead of 270, we will run the distillery factory for 330 days.

10)**Shri Mohanrao Gavhane, Gavhanwadi, Taluka – Phaltan, District – Satara-**

As you need bagasse and molasses, then will you need other raw material from the farmer and can the farmer grow requisite raw material?

Environment Consultant informed that at present the project requires sugarcane juice and molasses. But as we have said, alcohol can also be made from various grains like maize, rice. It is likely to be used as raw material in future.

At that time, Shri Gavhane asked whether alcohol can be made from grass. Project Environmental Consultant said that research is going on to produce alcohol from bagasse and it is likely to be successful. Today alcohol production from molasses, cane juice, grains is approved. Attempts were made to make alcohol from beet roots, but it could not succeeded. So only sugarcane juice and molasses will be used in the project.

11)**Shri Ashok Khashba Kharade, Residence – Chopdarwadi, Taluka – Patan, District – Satara –**

How many people will get job opportunities by this distillery project?

Project Managing Director informed that the 90.0 KLPD distillery requires 41 skilled workers and 38 unskilled workers. Skilled workers will be selected according to merit. But unskilled workers can be appointed from this area only. Total 79 people will be required.

12) **Shri Dinkar Maruti Sejwal, Sonavade, Taluka – Patan, District – Satara :-**

Which fuel will be used for the boiler and which pollution control system will be used?

A new 30.0 Tonne boiler will be commissioned for the steam required for the Distillery Project. For this, bagasse will be used as fuel.

Similarly, biogas will also be used in the project. Boiler will be erected with a 55 meter chimney and will be attached with a state-of-the-art Electro-Static-Precipitator (ESP), an air pollution control system with an efficiency of 99.9%. This will arrest the dust particles of the smoke.

13)**Shri Ramchandra Vitthal Kumbhar, Residence – Chopdarwadi, Taluka – Patan,District – Satara -**

Will the effluent/impure water from the sugar factory and the proposed distillery can be used for farmers' agriculture through ETP?

The treated effluent from the distillery plant cannot be discharged outside the plant, as this will increase the demand for fresh water. However, water from the distillation plant will not be released.

The treated effluent from the sugar department which is given to agriculture will be continued.

**14) Shri Chandrakant Ramchandra Kadam, Residence – At Post – Marali, Taluka – Patan, District – Satara -**

Solar energy information was told in the presentation. The electricity supply in the surrounding villages is interrupted many times. So will those villages get power from the solar power of the project?

Project Environmental Consultant said that information regarding solar energy has been shown in the presentation. But it will not be for individual houses in the area. It will be made available for schools, hospitals, public health centers, for emergency arrangements.

Convener appealed to the participants to raise environmental suggestions, thoughts, objections about the proposed project. There was no response from the audience

Convener, Environment Public Hearing Committee thanked all the participants for attending the meeting and on behalf of the Chairman, Environment Public Hearing Committee declared that Environment Public Hearing Meeting is concluded.

Meeting ended extending thanks to the Chair.

No written suggestions/objections received prior to public hearing and during public hearing.

(Amol Satpute)
Convener,
Environment Public Hearing Committee
And
Sub Regional Officer,
Maharashtra Pollution Control Board,
Satara

(Shankar Waghmare)
Member,
Environment Public Hearing Committee
And
Regional Officer,
Maharashtra Pollution Control Board,
Pune

(Prashant Awate)
Chairman,
Environment Public Hearing Committee
And
Additional District Magistrate, Satara
District – Satara

**प्रकल्प प्रवर्तक मे. लोकनेते बाळासाहेब देसाई सहकारी साखर कारखाना लिमिटेड, गट नं. १३३/१/ब, १३३/२/ब, १३४, १३५/३/ब, १३५/५, १४९/१, १४९/३, १५१, १६०/१२, १६०/१८, १६०/३, १६०/७, १३२, १३३/१/अ, १४९/२, १६०/११, १६०/२, १६०/४, १६०/९, १३१/१,३,६,७,८,९,१०,११,१२,१३,१४,१५, मुक्काम पोस्ट-दौलतनगर, गाव-मरळी, तालुका-पाटण,जिल्हा-सातारा, महाराष्ट्र यांच्या नव्याने प्रस्तावित ९०.० केएलपीडी मोलॅसिस (बी एन्ड सी हेवी) शुगरकेन सिरप बेस डिस्टिलरी, ३.० मेगावॅट सहवीज निर्मिती प्रकल्प उभारणी संदर्भात पर्यावरण विषयक जाहिर जनसुनावणी बाबतचे इतिवृत्त -**

---

प्रकल्प प्रवर्तक मे. लोकनेते बाळासाहेब देसाई सहकारी साखर कारखाना लिमिटेड, गट नं. १३३/१/ब, १३३/२/ब, १३४, १३५/३/ब, १३५/५, १४९/१, १४९/३, १५१, १६०/१२, १६०/१८, १६०/३, १६०/७, १३२, १३३/१/अ, १४९/२, १६०/११, १६०/२, १६०/४, १६०/९, १३१/१,३,६,७,८,९,१०,११,१२,१३,१४,१५, मुक्काम पोस्ट-दौलतनगर, गाव-मरळी, तालुका-पाटण,जिल्हा-सातारा, महाराष्ट्र यांच्या नव्याने प्रस्तावित ९०.० केएलपीडी मोलॅसिस (बी एन्ड सी हेवी) / शुगरकेन सिरप बेस डिस्टिलरी, ३.० मेगावॅट सहवीज निर्मिती प्रकल्प उभारणी संदर्भात पर्यावरण विषयक जाहिर जनसुनावणी गुरुवार, दिनांक ३१ ऑगस्ट, २०२३ रोजी सकाळी ११.०० वाजता प्रकल्प स्थळ मे. लोकनेते बाळासाहेब देसाई सहकारी साखर कारखाना लिमिटेड, मुक्काम पोस्ट-दौलतनगर, गाव-मरळी, तालुका-पाटण,जिल्हा-सातारा, महाराष्ट्र येथे आयोजित करण्यात आलेली होती.

श्री अमोल आ. सातपुते, उप प्रादेशिक अधिकारी, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, सातारा तथा आयोजक, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती यांनी मा.श्री. प्रशांत आवटे, अपर जिल्हादंडाधिकारी, सातारा तथा अध्यक्ष, पर्यावरण विषयक जाहिर जनसुनावणी समिती, श्री शंकर वाघमारे, प्रादेशिक अधिकारी, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, पुणे तथा सदस्य, पर्यावरण विषयक जाहिर जनसुनावणी समिती, प्रकल्प प्रवर्तकांचे अधिकारी, पत्रकार, पर्यावरणविषयक कार्यरत



Amol

सेवाभावी संस्था, चॅनलचे प्रतिनिधी व मोठ्या संख्येने उपस्थित असलेल्या स्थानिक जनतेचे स्वागत करुन माननीय अध्यक्षांच्या परवानगीने पर्यावरणविषयक जनसुनावणी प्रक्रिया सुरु केली.

आयोजक, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती यांनी असे सांगितले की, भारत सरकारच्या पर्यावरण, वने व हवामान बदल मंत्रालय, नवी दिल्ली यांच्या दिनांक १४ सप्टेंबर, २००६ व सुधारित दिनांक १ डिसेंबर, २००९ च्या अधिसूचनेनुसार विशिष्ट प्रकल्पांना पर्यावरणविषयक अनुमती घेणे बंधनकारक असून त्यासाठी आगाऊ पर्यावरण विषयक जाहीर जनसुनावणी आयोजीत करणे बंधनकारक करण्यात आलेले आहे.

आयोजक, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती यांनी सांगितले की प्रकल्प प्रवर्तक मे. लोकनेते बाळासाहेब देसाई सहकारी साखर कारखाना लिमिटेड यांचा गट नं. १३३/१/ब, १३३/२/ब, १३४, १३५/३/ब, १३५/५, १४९/१, १४९/३, १५१, १६०/१२, १६०/१८, १६०/३, १६०/७, १३२, १३३/१/अ, १४९/२, १६०/११, १६०/२, १६०/४, १६०/९, १३१/१,३,६,७,८,९,१०,११,१२,१३,१४,१५, मुक्काम पोस्ट-दौलतनगर, गाव-मरळी, तालुका-पाटण,जिल्हा-सातारा, महाराष्ट्र येथे नव्याने प्रस्तावित ९०.० केएलपीडी मोलॅसिस (बी एन्ड सी हेवी)/शुगरकेन सिरप बेस डिस्टिलरी, ३.० मेगावॅट सहवीज निर्मिती प्रकल्प उभारणी संदर्भात पर्यावरण विषयक जाहिर जनसुनावणी आयोजित करण्यासाठी महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळास दिनांक ०६-०७-२०२३ रोजी अर्ज प्राप्त झाला.

सदरहू प्रकल्प पर्यावरण अधिसूचना २००६ आणि सुधारित नुसार संवर्ग बी-१ ५ (जी), १ (डी) मध्ये मोडत असल्याने सदरहू प्रकल्पास राज्य पर्यावरण आघात मुल्यांकन प्राधिकरण, पर्यावरण व वातावरणीय बदल मंत्रालय, महाराष्ट्र शासन, मुंबई यांची "पर्यावरण अनुमती" प्राप्त करणे व त्यासाठी आगाऊ पर्यावरण विषयक जाहिर जनसुनावणी घेणे बंधनकारक आहे.

आयोजक यांनी असे स्पष्टीकरण दिले की, पर्यावरण विषयक जाहिर जनसुनावणीचा मूळ उद्देश प्रकल्प परिसरातील सामान्य जनतेस प्रकल्पाविषयी व प्रकल्पामुळे होणारे परिणाम व त्याबाबत सामान्य जनतेच्या भावना जाणून घेणे, प्रकल्पात बंधनकारक असणाऱ्या प्रदूषण नियंत्रण संयत्रणेची माहिती सामान्य जनतेस देणे व त्यांनी दिलेल्या सूचनेचा विचार करणे आहे.

प्रकल्प प्रवर्तकांनी राज्य पर्यावरण आघात मुल्यांकन प्राधिकरण, पर्यावरण व वातावरणीय बदल मंत्रालय, महाराष्ट्र शासन, मुंबई यांची प्राथमिक मान्यता (ToR) प्रदान करण्यासाठी व पर्यावरण आघात मुल्यांकन अहवाल तयार करण्यासाठी ऑनलाईन अर्ज दिनांक २५-०३-२०२३ रोजी सादर केला व त्यास अर्जास ऑनलाईन मंजूरी दिनांक २७-०३-२०२३ रोजी प्रदान केली.

जिल्हाधिकारी, सातारा यांनी प्रत्यक्ष (Physical) पर्यावरणविषयक जनसुनावणी घेण्यास गुरुवार , दिनांक ३१ ऑगस्ट, २०२३ रोजी सकाळी ११. ०० वाजता मान्यता दिल्यानंतर सदस्य सचिव, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, मुंबई यांनी भारत सरकारच्या पर्यावरण, वने व हवामान बदल मंत्रालयाच्या अधिसुचना दिनांक १४-०९-२००६ व सुधारित अधिसुचना दिनांक ०१-१२-२००९ अनुसार त्यांच्या कार्यालयीन आदेश क्रं. ई- ५६/२०२३ ,व्दारा पत्र क्रं.बीओ/जेडी/डब्लुपीसी/पीएच/बी-२३०८०८ एफटीएस -०१७६ दिनांक -०८-०८-२०२३ अन्वये खालीलप्रमाणे पर्यावरण विषयक जाहिर जनसुनावणी समिती गठित केलीः-

१) जिल्हादंडाधिकारी, सातारा, किंवा त्यांचे प्रतिनिधी (अतिरिक्त जिल्हादंडाधिकारी यांच्यापेक्षा कमी दर्जाचा नसावा) - अध्यक्ष

२) महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ,मुंबई यांचे प्रतिनिधी – प्रादेशिक अधिकारी -पुणे, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, पुणे - सदस्य

३) उप प्रादेशिक अधिकारी, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, सातारा - आयोजक

सदरहू अधिसूचनेनुसार उप प्रादेशिक अधिकारी, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, सातारा यांनी जनसुनावणी दिवसाच्या ३० दिवस अगोदर स्थानिक वृत्तपत्र दैनिक सकाळ यात मराठीत व राष्ट्रीय वृत्तपत्र इंडियन एक्सप्रेस यात इंग्रजीत ३१-०७-२०२३ रोजी



Amol

जाहिर जनसुनावणीबाबत जाहिरात प्रकाशित केली होती. त्याचप्रमाणे सदरहू प्रकल्पाबाबतचा सर्व दस्तावेज लोकांच्या माहितीकरीता/अवलोकनार्थ खालील अधिसूचित कार्यालयात उपलब्ध करण्यात आलेले होते -

१) जिल्हाधिकारी कार्यालय, सातारा,

२) महाव्यवस्थापक, जिल्हा उद्योग केंद्र,सातारा

३) मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद कार्यालय, सातारा

४) तहसीलदार, तहसील कार्यालय-पाटण, तालुका- पाटण, जिल्हा-सातारा,

५) ग्रामपंचायत कार्यालय § मुक्काम पोस्ट § मरळी, तालुका-पाटण, जिल्हा- सातारा,

६) पर्यावरण व वातावरणीय बदल विभाग, महाराष्ट्र शासन, नवीन प्रशासकीय इमारत, १५ वा मजला, मादाम कामा मार्ग, मंत्रालय, मुंबई- ४०० ०३२.

७) क्षेत्रीय कार्यालय, पश्चिम मध्य झोन, पर्यावरण, वने व हवामान बदल मंत्रालय, न्यु सेक्रेटरिअल बिल्डिंग तळमजला, ईस्ट विंग, सिव्हिल लाईन, नागपूर,

८) सहसंचालक (जल प्रदूषण नियंत्रण) - मुख्यालय, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, कल्पतरू पॉईंट, ३रा मजला, सायन माटुंगा स्कीम रोड नं. ८, सायन (पूर्व), मुंबई - २२

९) प्रादेशिक अधिकारी, प्रादेशिक कार्यालय, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, ३ रा मजला, जोग सेंटर, जुना मुंबई-पुणे रस्ता, वाकडेवाडी, पुणे - ४११ ००३

१०) उप प्रादेशिक अधिकारी, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ,नविन प्रशासकीय इमारत, २रा मजला, एस.टी. स्टॅण्डच्या मागे, सदरबझार, सातारा

११) संकेतस्थळ, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, मुंबई.

आजतागायत उपरोक्त प्रकल्पाविषयी उप प्रादेशिक अधिकारी, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, सातारा यांना एकही सूचना/आक्षेप/हरकत प्राप्त झालेला नाही.

आयोजक यांनी उपस्थित असलेल्या सर्वांना त्यांचे काही आक्षेप,हरकती, सूचना असल्यास ती संधी देण्यात आलेली असून ते लेखी वा तोंडी स्वरुपात ती देऊ शकतात असे सांगितले.

आयोजक यांनी प्रतिपादन केले की , ही समिती फक्त लोकांचे पर्यावरणविषयक मत, सूचना, आक्षेप नोंदविण्यासाठी असून प्रकल्प संमत करणे, नाकारणे किंवा शिफारस करण्याचा अधिकार या समितीस नाही. आपण जनसुनावणीत उपस्थित केलेल्या सूचना/आक्षेप यांची इतिवृतात नोंद घेण्यात येईल. त्याचप्रमाणे सदरहू बैठकीची व्हिडिओ रेकॉर्डींग जशीच्या तशी चित्रफित, बैठकीत उपस्थित करण्यात आलेल्या सूचना, आक्षेप यांची नोंद घेऊन प्रकल्प प्रवर्तकांचा सुधारित पर्यावरण मुल्यांकन अहवाल पर्यावरण, पर्यावरण व वातावरणीय बदल मंत्रालय, महाराष्ट्र शासन, मुंबई यांना अध्यक्ष, पर्यावरणविषयक जाहीर जनसुनावणी समिती यांच्या संमतीने मुख्यालय, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ यांच्यातर्फे सादर करावयाचा असतो, त्यावर तेथील तज्ज्ञ समिती त्याबाबत पुढील निर्णय घेते. आयोजक यांनी अध्यक्षांना प्रकल्प प्रवर्तकांना सादरीकरण सुरु करण्याचे आदेश देण्याची विनंती केली.

माननीय अध्यक्षांच्या परवानगीने प्रकल्प पर्यावरण सल्लागार यांनी प्रकल्पाविषयी व पर्यावरण व्यवस्थापन योजनेविषयी सादरीकरण केले.

त्यांनी सांगितले की सदरहू आसवणी प्रकल्पाची एकूण गुंतवणूक १३०.० कोटी, साखर कारखान्याची गुंतवणूक रुपये ४७.२३ कोटी - एकूण १७७.२३ कोटी आहे. तर पर्यावरण व्यवस्थापनासाठी भांडवली खर्च अंदाजे - रुपये १,३१०.०० लाख, तर वार्षिक देखभाल खर्च - रुपये २००.० लाख रुपये अपेक्षित आहे. सदरहू प्रकल्प हा झिरो लिक्विड डिस्चार्ज प्रकल्प आहे.

सादरीकरणानंतर आयोजक, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती यांनी उपस्थितांना प्रस्तावित प्रकल्पाविषयी काही पर्यावरणविषयक आक्षेप, सूचना असल्यास त्या नोंदविण्याचे आवाहन केले.

**उपस्थित नागरिकांनी विचारलेले प्रश्न व त्यास प्रकल्प प्रवर्तक / प्रकल्प सल्लागार / पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती यांना दिलेली उत्तरे याबाबतची माहिती पुढीलप्रमाणे आहे-**

१) श्री जालिंदर अनंत पाटील, मुक्काम पोस्ट-मरळी, तालुका - पाटण, जिल्हा -साताराः-

प्रस्तावित मोलॅसिस प्रकल्पातून दररोज किती अल्कोहोल तयार होईल?

प्रकल्प पर्यावरण सल्लागार यांनी सांगितले की हा ९०.० किलो लिटर प्रति दिन क्षमतेचा प्रकल्प आहे. त्यात आर. एस., इ.एन.ए., इथेनॉल हे ९०.० केएलपीडी म्हणजे ९०.० हजार लिटर प्रति दिन उत्पन्न करण्यात येईल.

२) श्री संतोष निवृत्ती गिरी, मुक्काम पोस्ट-मरळी, तालुका - पाटण, जिल्हा - सातारा:-

डिस्टीलरी प्रकल्पासाठी किती खर्च येणार आहे?

प्रकल्प पर्यावरण सल्लागार यांनी उत्तर दिले की डिस्टीलरी प्रकल्पाची किंमत १३०.० कोटी आहे. सद्या कारखान्याची ४७.२३ आहे. पूर्ण डिस्टीलरी व उत्पादन प्रक्रियेसाठी १३०.० कोटी गुंतवणूक आहे.

३) श्री नितीन महादेव जगताप, प्रशासक, ग्रामपंचायत -मरळी, तालुका-पाटण, जिल्हा-सातारा:-

मी विनंती करतो की या प्रकल्पामुळे गावातील लोकांचा विकास कसा होईल? याबाबत स्पष्टीकरण देण्यात यावे.

प्रकल्प पर्यावरण सल्लागार यांनी सांगितले की गावातील लोकांना रोजगाराची संधी मिळणार आहे. या आसवणी प्रकल्पात ४० व्यक्तींना प्रत्यक्ष रोजगार मिळणार आहे. आसवणी प्रकल्पामुळे या प्रकल्पामुळे परिसरातील अप्रत्यक्ष व्यवसायात प्रचंड प्रमाणात वाढ होईल जसे की वाहतुकीसाठी टॅंकर्स, गाड्या लागतील, दुचाकी दुरुस्ती केंद्र, पान-चहाची टपरी या व्यवसायात प्रचंड प्रमाणात वाढ होईल. शिवाय या आसवणी प्रकल्पामुळे प्रकल्पात कार्बन-डाय-ऑक्साईड बॉटलिंग, पोटॅश रिकव्हरी प्रकल्पामुळे प्रकल्पास अतिरिक्त उत्पन्न मिळू शकते. त्यामुळे स्थानिक शेतक-यांच्या ऊसाला योग्य/अतिरिक्त भाव देता येईल. पोटॅश राख ही शेतकरी खतासाठी वापरू शकतात. आसवणी प्रकल्पातील स्पेंट वॉशचे पावडरमध्ये रुपांतर करण्यात येणार आहे. ती अल्प दरात शेतक-यांना खत म्हणून वापरण्यास उपलब्ध करण्यात येईल.

४) श्री संग्राम सुभाष देसाई, मुक्काम पोस्ट-मरळी, तालुका - पाटण, जिल्हा -सातारा:-

प्रकल्पातून सांडपाणी बाहेर सोडण्यात येणार नाही. तर प्रकल्प उत्पादन जे सांडपाणी उत्पन्न होईल, त्याचे काय करणार?

प्रकल्प पर्यावरण सल्लागार यांनी उत्तर दिले की आसवणी प्रकल्पातील सांडपाण्याचे स्त्रोत पहिला म्हणजे स्पेंट वॉश. तर रॉ स्पेंट वॉश एम.ई.ई. मध्ये इव्हॅपोरेट व कॉन्सनट्रेट केला जाईल. नंतर तो स्पेंट वॉश ड्रायिंग करुन त्या स्पेंट वॉशचे पावडरमध्ये रुपांतर करण्यात येईल. प्रकल्पातील इतर स्त्रोतातील सांडपाणी कुलिंग, ब्रॉयलरमधील हे सीपीयु - कन्डेन्सेट पॉलिशिंग युनिटमध्ये प्रक्रिया करुन त्याचा प्रकल्प उत्पादनात पुनर्वापर करणार आहेत. त्यामुळे कारखान्याची जे ८३९.० घनमीटर

मोलॅसिस सीपीयुमध्ये प्रक्रिया करुन प्रकल्प उत्पादनात पुनर्वापर करणार आहोत. त्यामुळे ताज्या पाण्याची गरज ही कमी होते.

५) श्री उत्तमराव रामचंद्र खराडे, राहणार-चोपदारवाडी सांगवड, तालुका-पाटण, जिल्हा-साताराः-

आमचे गाव हे प्रकल्पाला लागूनच आहे. तर उत्पादन प्रकल्पात उत्पन्न होणा-या स्पेंट वॉशमुळे परिसरातील गावांना दुर्गंधीचा काही त्रास होईल काय व त्याबाबत उपाय योजना.

प्रकल्प पर्यावरण सल्लागार यांनी सांगितले की ही चांगला प्रश्न आहे. पूर्वीच्या आसवणी प्रकल्पात स्पेंट वॉश ही ओपन लगुन्समध्ये केला जायचा. त्यामुळे दुर्गंधी येत असते. आता बंद सर्कीट असणार आहे. स्पेंट वॉश हा डिस्टिलेशन कॉलममधून बायोमिथिनायझेशनला जाणार. फक्त एक दिवसाची साठवण (स्टोरेज) असणार आहे. बायोमिथिनायझेशनला जाणार, लगेच कॉन्सन्ट्रेशनला जाणार, नंतर लगेचच ड्रायरला जाणार व लगेसच त्याचे पावडरमध्ये रुपांतर होणार आहे. त्यामुळे स्पेंट वॉशची दुर्गंधी येणार नाही.

६) श्री प्रशांत कृष्णाजी मोहिते, मुक्काम पोस्ट-मरळी,तालुका-पाटण, जिल्हा-साताराः-

सदरहू प्रकल्पामुळे परिसरात ध्वनी प्रदूषणाचा काही त्रास होईल काय?

आसवणी प्रकल्पात घर्षण होणारी उपकरणे नाहीत. आसवणी प्रकल्पात पंप्स, मोटर्स असतील तेथे ध्वनी निर्माण होतो. आसवणी प्रकल्पात डिस्टीलेशन कॉलम्समध्ये आवाज येतो, मात्र तो प्रकल्पाच्या कुंपणाच्या बाहेर जाणार नाही. ज्याप्रमाणे मायनिंग प्रकल्पात डंपर्स, ब्रेकर्स असतात, तसे येथें नाही फरमेन्टेशनमध्ये आवाज येत नाही. तेथे फक्त पंप्सचा आवाज येतो. डिस्टिलेशन कॉल्मसना स्टीमचा आवाज येतो. प्रकल्पाच्या कुंपणाबाहेर किंवा गावापर्यंत आवाज जाणार नाही. प्रकल्पात ध्वनी उत्पन्न होणाऱ्या विभागाजवळ काम करणा-या कर्मचा-यांना इअर प्लग्स, मफ्स पुरविण्यात येतील. प्रकल्पाबाहेर कुठलाही ध्वनी प्रदूषणाचा त्रास होणार नाही.

७) श्री कृष्णा विठ्ठल कदम, मुक्काम पोस्ट-मरळी,तालुका-पाटण, जिल्हा-साताराः-

प्रकल्पामुळे आजूबाजूच्या गावांना कोणता फायदा होणार आहे?

प्रकल्प परिसरातील गावातील ४० व्यक्तींना प्रत्यक्ष रोजगार मिळणार आहे. आसवणी प्रकल्पात उप-पदार्थाचे उत्पादन होणार आहे उदा. प्रकल्पातील कार्बन-डाय-ऑक्साईड बॉटलिंगसाठी, पोटॅश रिकव्हरी प्रकल्पामुळे प्रकल्पास अतिरिक्त उत्पन्न मिळू शकते. त्यामुळे स्थानिक शेतक-यांच्या ऊसाला योग्य/अतिरिक्त भाव देता येईल. पोटॅश राख ही शेतकरी खतासाठी वापरू शकतात. आसवणी प्रकल्पातील स्पेंट वॉशचे पावडरमध्ये रुपांतर करण्यात येणार आहे. ती अल्प दरात शेतक-यांना खत म्हणून वापरण्यास उपलब्ध करण्यात येईल. सदरहू प्रकल्पामुळे परिसरितील अप्रत्यक्ष व्यवसायात प्रचंड प्रमाणात वाढ होणार आहे.

Amol

आसवणी प्रकल्पामुळे या प्रकल्पामुळे परिसरातील अप्रत्यक्ष व्यवसायात प्रचंड प्रमाणात वाढ होईल जसे की वाहतुकीसाठी टँकर्स, गाड्या लागतील, दुचाकी दुरुस्ती केंद्र, पान-चहाची टपरी या व्यवसायात प्रचंड प्रमाणात वाढ होईल. शिवाय या आसवणी प्रकल्पामुळे प्रकल्पात कार्बन-डाय-ऑक्साईड बॉटलिंग, पोटॅश रिकव्हरी प्रकल्पामुळे प्रकल्पास अतिरिक्त उत्पन्न मिळू शकते. त्यामुळे स्थानिक शेतक-यांच्या ऊसाला योग्य/अतिरिक्त भाव देता येईल. पोटॅश राख ही शेतकरी खतासाठी वापरू शकतात. आसवणी प्रकल्पातील स्पेंट वॉशचे पावडरमध्ये रुपांतर करण्यात येणार आहे. ती अल्प दरात शेतक-यांना खत म्हणून वापरण्यास उपलब्ध करण्यात येईल. वाहतुकीसाठी टँकर्स, गाड्या लागतील, दुचाकी दुरुस्ती केंद्र, पान-चहाची टपरी या व्यवसायात प्रचंड प्रमाणात वाढ होईल.

या प्रकल्पामुळे परिसरातील अप्रत्यक्ष व्यवसायात प्रचंड प्रमाणात वाढ होईल जसे की वाहतुकीसाठी टँकर्स, गाड्या लागतील, दुचाकी दुरुस्ती केंद्र, पान-चहाची टपरी या व्यवसायात प्रचंड प्रमाणात वाढ होईल.

प्रकल्प पर्यावरण सल्लागार यांनी प्रकल्पाचे कार्यकारी संचालक यांना उत्तर देण्याची विनंती केली.

प्रकल्पाचे कार्यकारी संचालक यांनी सांगितले की प्रस्तावित आसवणी प्रकल्पात एकूण ७९ व्यक्तींची गरज आहे. त्यात कुशल कामगार हे ४१ लागतील, तर अकुशल कामगार ३८ लागतील. तर कुशल कामगार हे गुणवत्तेनुसार घेण्यात येतील. तर अकुशल कामगार हे परिसरातील घेण्यात येतील. या प्रकल्पामुळे रोजगाराची निर्मिती होणार आहे.

प्रकल्पाच्या कार्यकारी संचालक यांनी सांगितले की आसवणी प्रकल्पामुळे कारखान्यास मिळणाऱ्या अतिरिक्त उत्पन्नामुळे ऊसाला जादा भाव देता येईल.

८) श्री दीपक शंकर गव्हाणे, राहणार-गव्हाणेवाडी, तालुका-पाटण, जिल्हा-साताराः-

प्रस्तावित अल्कोहोल निर्मिती प्रकल्पात किती स्पेंट वॉश उत्पन्न् होईल व त्याची विल्हेवाट कशी लावण्यात येईल?

प्रकल्प पर्यावरण सल्लागार यांनी सांगितले की रॉ स्पेंट वॉश जरी ८.० किलोलिटरचे मानक आहे, तरी तो कॉन्सेन्ट्रेट करुन ३.० किलोलिटर पर्यंत आणणार आहोत. तर १४४.० केएलपीडी एवढा स्पेंट वॉश कॉन्सेन्ट्रेट करुन बाहेर पडणार आहे. त्याचे रुपांतर पावडर स्वरुपात करुन ते अल्प दरात शेतक-यांना खत म्हणून उपलब्ध करता येणे शक्य आहे. प्रकल्पात १४४.० केएलपीडी एवढा स्पेंट वॉश तर मोलॅसिस ७२०.० केएलपीडी सर्वात जास्त प्रमाण असू शकते, कारखान्यात तयार होईल.

९) **श्री मधुकर हिंदुराव सुर्यवंशी, सांगोळी विकास समिती सोसायटी, राहणार-सुर्यवंशीवाडी, तालुका--पाटण, जिल्हा-साताराः-**

आपल्या या १७७ कोटी प्रकल्पासाठी मी प्रकल्प व्यवस्थापनाचे अभिनंदन. आपला हा आसवणी प्रकल्प किती दिवस चालू राहिल?

आसवणी प्रकल्प हा पूर्ण वर्ष कार्यरत राहणार आहे. प्रकल्प ३३० दिवस चालू राहिल असे सांगितले कारण तीस दिवस हे देखभालीसाठी (Maintenance) राखीव ठेवण्यात आलेले आहेत. कारण प्रकल्पात झिरो लिक्विड डिस्चार्ज अंमलात आणणार आहोत, म्हणजे प्रकल्पातून प्रकिया केलेल्या सांडपाण्याचा एकही थेंब प्रकल्पाबाहेर सोडला जाणार नाही. आता कंपोस्टींग नाही. पूर्वी स्पेंट व्रॉश बायोमिथिनायझेन नंतर कंपोस्टींगला जायचा. कंपोस्टींग पावसाळ्यात होऊ शकत नाही. कारण तेवढे तापमान राहू शकत नाही, कारण बॅकटेरियल कल्चर तेवढे उगवत नाही. त्यामुले पर्यावरण,वने व हवामान बदल मंत्रालय, भारत सरकार, नवी दिल्ली यांच्या निर्देशांनुसार कंपोस्टींग हे करण्यातच येणार नाही. त्यामुळे २७० ऐवजी ३३० दिवस कारखाना चालविणार आहोत.

१०) **श्री मोहनराव गव्हाणे, गव्हाणवाडी, तालुका-पाटण, जिल्हा-साताराः-**

आपल्याला बगॅस व मोलॅसिस लागते, तसे शेतक-याकडून दुसरा कच्चा माल लागेल का व तो कच्चा माल शेतक-यांना पिकवता येईल काय?

सध्या प्रकल्पात ऊसाचा रस आणि मोलॅसिस लागणार आहे. पण आपण सांगितल्याप्रमाणे विविध धान्ये म्हणजे मका, तांदूळ यापासूनसुध्दा अल्कोहोल बनविता येते. भविष्यात ते कच्च्या माल म्हणून वापरता येण्याची शक्यता आहे.

त्यावेळी श्री गव्हाणे यांनी गवतापासून अल्कोहोल बनवता येईल काय? याबाबत विचारणा केली. पर्यावरण सल्लागार यांनी सांगितले की बगॅसपासून अल्कोहोल तयार करण्याबाबत संशोधन चालू असून त्यास यश मिळण्याची शक्यता आहे. आज मोलॅसिस, केन ज्यूस,ग्रेन्स पासून अल्कोहल निर्मितीस मान्यता मिळालेली आहे. बीटापासून अल्कोहोल बनविण्याचा प्रयत्न करण्यात आला, पण त्यास यश आले नाही. तर प्रकल्पात फक्त ऊसाचा रस व मोलॅसिस एवढेच वापरात येणार आहे.

११) **श्री अशोक खाशबा खराडे,राहणार-चोपदारवाडी, तालुका-पाटण, जिल्हा-साताराः-**

या आसवणी प्रकल्पामुळे किती लोकाना रोजगार मिळेल?

प्रकल्पाचे कार्यकारी संचालक यानी सांगितले की ९०.० केएलपीडी आसवणी प्रकल्पासाठी कुशल कामगार ४१ लागतात, तर अकुशल कामगार हे ३८ लागतात. कुशल कामगार हे गुणवत्तेनुसारच घेणार आहेत. तर अकुशल कामगार हे आपल्या भागातील घेऊ शकतो. असे एकूण ७९ लोक लागणार आहेत.

१२) श्री दिनकर मारुती सेजवळ, सोनवडे, तालुका- पाटण, जिल्हा-साताराः-

बॉयलरसाठी कुठले इंधन वापरण्यात येणार व प्रदूषण नियंत्रणसाठी कुठली सयंत्रणा वापरण्यात येईल?

आसवणी प्रकल्पासाठी जी वाफ (स्टीम) लागणार आहे, त्यासाठी ३०.० टनाचा नविन बॉयलर कार्यान्वित करण्यात येणार आहे. त्यासाठी बगॅस इंधन म्हणून वापरण्यात येईल त्याचप्रमाणे प्रकल्पात बायोगॅससुध्दा वापरण्यात येईल. त्या बॉयलरला ५५ मीटर्सची चिमणी बसवून त्यास अत्याधुनिक इलेक्ट्रो-स्टॅटिक-प्रेसिपरेटर हे हवा प्रदूषण नियंत्रण सयंत्रणा कार्यान्वित करण्यात येणार आहे, ज्याची क्षमता ९९.९% एवढी आहे. त्यामुळे धुरातील धुलीकणांचा अटकाव होईल.

१३) श्री रामचंद्र विठ्ठल कुंभार, राहणार-चोपदारवाडी, तालुका-पाटण, जिल्हा-साताराः-

साखर कारखाना व प्रस्तावित आसवणी प्रकल्पातील अशुध्द पाण्याचा वापर ईटीपी व्दारे शेतकऱ्यांच्या शेतीसाठी होईल काय?

आसवणी प्रकल्पातील प्रक्रिया केलेले सांडपाणी हे प्रकल्पाबाहेर देता येणार नाही, कारण त्यामुळे ताज्या पाण्याची जास्त गरज लागेल. तरी आसवणी प्रकल्पातील पाणी बाहेर देण्यात येणार नाही,

साखर विभागातील पाणी जे शेतीला देण्यात येते, तेच करण्यात येईल.

१४) श्री चंद्रकांत रामचंद्र कदम, राहणार- मुक्काम पोस्ट-मरळी, तालुका - पाटण, जिल्हा - साताराः-

सादरीकरणात सोलर विषयी सांगण्यात आले. आजूबाजूच्या गावातील वीजपुरवठा हा ब-याचवेळा खंडीत होतो. तर त्या गावांना प्रकल्पाच्या सोलर वीजेतून उर्जा मिळेल काय?

प्रकल्प पर्यावरण सल्लागार यांनी सांगितले की सोलर एनर्जी सादरीकरणात दर्शविण्यात आलेले आहे. मात्र तो परिसरातील वैयक्तिक घरांसाठी राहणार नाही. तो शाळेसाठी, हॉस्पिटल, सार्वजनिक आरोग्य केंद्र, जी आपत्कालीन व्यवस्थेसाठी उपलब्ध करण्यात येईल.

आयोजक यांनी उपस्थितांना प्रस्तावित प्रकल्पाविषयी पर्यावरणीय सूचना, विचार, आक्षेप नोंदविण्याचे आवाहन केले. उपस्थितांकडून कोणताच प्रतिसाद नव्हता.

आयोजक, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती यांनी सर्व उपस्थितांचे बैठकीस उपस्थित राहिल्याबद्दल आभार मानले व मा. अध्यक्षांच्या वतीने जनसुनावणी संपन्न झाल्याचे घोषित केले,

मा. अध्यक्ष यांचे आभार व्यक्त करुन आजची जाहिर जनसुनावणी ही संपन्न झाल्याचे जाहिर करण्यात आले.

सदर जाहिर जनसुनावणी पूर्वी व जनसुनावणी दरम्यान लेखी सूचना/आक्षेप/हरकती प्राप्त झालेले नाहीत.

(अमोल सातपुते)
आयोजक,
पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती
तथा
उप प्रादेशिक अधिकारी,
महाराष्ट्र प्रदूषण
नियंत्रण मंडळ, सातारा

(शंकर वाघमारे)
सदस्य,
पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती
तथा
प्रादेशिक अधिकारी,
महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, पुणे

(प्रशांत आवटे)
अध्यक्ष,
पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती
तथा
अपर जिल्हादंडाधिकारी, सातारा,
जिल्हा - सातारा.